दैनिक

# खबर से हकीकत तक

KHABAR SE HAKIKAT TAK

* WEBSITE: https://khabarsehakikattak.in
* मुख्य संपादक : शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो. ९०४९८४४४१२

*Email: me.khabar2023@gmail.com
*Email: shirishkumarsherkhane@gmail.com
*RNI No.: MAHMAR/2023/86200

*लातूर * मराठी * दैनिक * वर्ष १ ले * अंक ८ वा * शनिवार दि. ०८ नोव्हेंबर २०२५ * पाने ४ * किंमत २

*Latur * Marathi * Daily * Year 1 * Issue 8 * Saturday 08 November 2025 *Page 4 * 2 Price


# विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडविण्यासाठी ‘वंदे मातरम’चा संकल्प करूया -मुख्यमंत्री फडणवीस





## मंत्रालयात सामूहिक ‘वंदे मातरम’ गीताचे गायन

मुंबई (प्रतिनिधी) : जात, पंथ, धर्म, भाषांचे भेद विसरून स्वातंत्र्यलढ्यात सर्वांनी वंदे मातरम् म्हटले होते. वंदे मातरम् हा स्वातंत्र्यलढ्याचा परवलीचा शब्द होता आणि क्रांतिकारकांचे घोषवाक्यही याच गीतातून तयार झाले. विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडवण्यासाठी राष्ट्रभक्ती आणि एकात्मता आवश्यक आहे. यासाठी ‘वंदे मातरम’च्या सामूहिक गायनाने संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामुहिक वंदे मातरम् गीत गायनप्रसंगी केले.

मंत्रालयात वंदे मातरम् गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग आणि सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित सामूहिक ‘वंदे मातरम’ गायनाचा कार्यक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, कौशल्य विकास, रोजगार, नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश कुमार, पद्मश्री पद्मजा फेणानी-जोगळेकर यांच्यासह मंत्रालयातील वरिष्ठ सनदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पद्मजा फेणानी-जोगळेकर यांच्यासोबत सर्व मान्यवरांनी एकत्र येऊन वंदे मातरमचे गायन करत राष्ट्रभावना दृढ करण्याचा संकल्प व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वंदे मातरम्□ हे केवळ गीत नाही, तर देशाला जोडणारी, एकसंध ठेवणारी भावना आहे. कोलकाताच्या टाउन हॉलमध्ये ३० हजारपेक्षा अधिक जनता जमली होती. त्याठिकाणी पहिल्यांदा वंदे मातरमची पहिली घोषणा झाली. त्याला प्रतिसाद देत ३० हजार लोकांनी सामूहिक वंदे मातरमचा जयघोष केला. त्यानंतर वंग-भंग चळवळीच्यावेळी प्रेरणा गीत, संघर्ष गीत झाले. त्या दिवसापासून सगळीकडे, इंग्रजांच्याविरुद्ध ‘वंदे मातरम’ म्हणत लढा सुरू झाला. प्रभात फेऱ्या, कार्यक्रमांमध्ये, आंदोलनामध्ये हल्ला केला तरी ‘वंदे मातरम’ गायिले जात होते. काँग्रेसच्या अधिवेशनात रविंद्रनाथ टागोरांनी वंदे मातरम गायिले. यानंतर जात, धर्म, पंथ सगळे विभाजन विसरून संपूर्ण भारतीय समाज एकत्र येवून वंदे मातरमचे घोषवाक्य तयार झाले. तेव्हापासून हे एक प्रकारे राष्ट्रगीत म्हणून ‘वंदे मातरम तयार झाले. स्वातंत्र्यसंग्राम सेनानी फाशीवर जातानाही ‘वंदे मातरम’ म्हणायचे. अहिंसेतून आपल्याला स्वातंत्र्य प्राप्त करायचं आहे, असे म्हणणाऱ्या नेत्यांचे ‘वंदे मातरम’ घोषवाक्य झाले. स्वातंत्र्याच्या परवलीचा शब्द तयार झाला. स्वातंत्र्य लढ्यामध्ये मोलाचे योगदान वंदे मातरमने दिले. स्वतंत्र भारताचा झेंडा तयार करतानाही त्यावर वंदे मातरम् लिहिण्यात आले. महात्मा गांधी आपल्या प्रत्येक पत्राचा समारोप हा वंदे मातरमने करीत. भारताच्या संविधानाच्या निर्मितीनंतर जन गण मन आणि वंदे मातरम् दोन्ही गीतांना राष्ट्रगीताचा दर्जा देवून समान सन्मान दिला, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. १५० वर्ष झाली तरी, आजही वंदे मातरम् एक प्रकारे आपल्या भारताला दिशा देणारे गीत आहे. गीतामध्ये आपल्या मातृभूमीचं वर्णन केलेलं आहे. स्वातंत्र्य लढ्यामध्ये जाती, पंथ, धर्म, भाषा सगळे भेद विसरून प्रत्येकाने वंदे मातरम् म्हटले. वंदे मातरम हे कुठल्याही एका धर्माचे गीत नाही. सर्व धर्मांना प्रेरणा देणारे प्रेरणागीत, राष्ट्रगीत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशभरात वंदे मातरम् सामूहिक गायनाचा कार्यक्रम हाती घेतला तर राज्यामध्येही मंत्री मंगल प्रभात लोढा यांनीही संकल्पना मांडली. यामुळे राज्याच्या प्रत्येक भागामध्ये, प्रत्येक शाळेमध्ये सामुहिक वंदे मातरमचा कार्यक्रम होत आहे. गीताची भावना प्रत्येक तरुण, विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यभर वंदे मातरम होत आहे. १९०५ साली वंगभंगच्या वेळी आणि स्वातंत्र्य मिळताना जी भावना तयार झाली, तीच भावना संपूर्ण भारतामध्ये तयार करण्याचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. प्रधानमंत्री मोदी यांचे एक विकसित भारताचे स्वप्न आहे. भारतामध्ये ‘विकास भी और विरासत भी’, अशा प्रकारची भावना त्यांनी मांडली आहे. विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत, नालंदा आणि तक्षशिलासारख्या विश्वविद्यालयाच्या माध्यमातून जगाला ज्ञान देणारा भारत, भगवान गौतम बुद्धांचे तत्वज्ञान संपूर्ण विश्वात नेणारा भारत घडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी केले. क्रांतीकारकांना प्रेरणा देणारे समरगीत- मंत्री आशिष शेलार

वंदे मातरम् गीताचे संपूर्ण देशभर गायन होत आहे. या गीताने स्फुरण येते. शब्द, गीत, प्रेरणा म्हणजेच वंदे मातरम् आहे. हे स्वातंत्र्य गीत, आत्मिक प्रेरणा गीत असून क्रांतीकारकांनाही प्रेरणा देणारे समर गीत असल्याचे प्रतिपादन मंत्री आशिष शेलार यांनी केले. सर्व धर्म, जाती, पंथ येवून गीत गातात, यातून एकत्रित जगण्याची प्रेरणा मिळते. जगाला हेवा वाटावा असे एकमेव गीत असल्याचेही त्यांनी प्रास्ताविकात सांगितले. यावेळी पूर्वा निर्मिती विश्वतर्फे ‘वंदे मातरम’वर पथनाट्य सादर करण्यात आले. सर्व धर्म, भाषांमधून विविध पोषाखात हातात वंदे मातरम लिहिलेले फलक घेतलेले युवक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

कार्यक्रमानंतर दिल्ली येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे ‘वंदे मातरम’चे सामुहिक गायन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संबोधन झाले.

---

### शहर वाहतूक नियंत्रण शाखा पोलीस विभागाच्या कारवाईला आला वेग

# वाहनांना पार्क करणारे चार चाकी, दुचाकी वाहनावर तसेच बेशिस्त रिंग रोडवर, सर्व्हिस रोडवर वाहन पार्कींग करणारे वाहनावर ई-चलान मशिनव्दारे





लातूर (प्रतिनिधी) : यायावत अधिक माहिती अशी की, लातूर शहरातील नियम वाहय वाहनावर उदा खाचूचे हातगाड यासमोर बेशिस्त पार्क करणारे चार-वाकी, दुचाकी वाहनावर तसेच बेशिस्त रिंग रोहवर, सर्व्हिस रोडवर वाहन पाकींग करणारे वाहनावर ई चालान मशिनव्दारे दंडात्मक कार्यवाहीची १५ दिवस विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे, मोठ्या आवाजाचे सापलन्स काढून जप्त करण्यात येत असून, दु-व्हिलर वाहनावर ट्रिपल सिट प्रवास करणारे वाहन चालकाविरुध्द वाहतुकीचे नियमन करणे करीता मा. श्री. समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर यांनी लातूर शहरातील वेशिस्त वाहन चालकांना शिस्त लावण्यात येणार आहे. त्यात ऑटोरिक्षाचालक सर्रासपणे वाहतुक नियमांचे उल्लंघन करीत रिक्षामध्ये चालकाचे बाजूस फ्रंटशिटला प्रवासी घेणे, गणवेष परिधान न करणे, शहरात रोडवर बेशिस्त पणे कोठेही धांवून प्रवासी चढ़-उतार करणे, चौका-चौकांमध्ये वळणावर प्रवासी घेण्यासाठी ऑटोरिक्षाची दुहेरी रांग करुन थांबवणे इत्यादीमुळे सामान्य नागरिकांना विनाकारण रहदारीस अडचण निर्माण होवून त्रास होत असल्याच्या तक्रारी येत असल्याने, फ्रंटशिट घेण्याऱ्या, गणवेश परिधान न करणाऱ्या, तसेच ट्रिपल सिट मोटार सायकलवर प्रवास करणारे, विना कागदपत्र, इन्शुरन्स, पिळीसी संपलेले व सोचत न बाळगणारे वाहन चालकावर, वाहन चालवताना मोवाईलवर बोलणारे चालकावर व इतर वाहनावर मोटार वाहन अधिनियमान्वये कार्यवाही करण्यासाठी मा. श्री. समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर पांचे मार्गदर्शनाखाली वाहतुक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री विठ्ठल दराडे यांचे नेतृत्वात विशेष मोहिम राबविणे चालू आहे. त्यात वाहतूक कोडी कामी कावी व वाहतुकीस शिस्त लागावी म्हणून महानगर पालिका, बस डेपोविभागीय कार्यालय रापम, मा जिलाधिकारी यांची पत्रव्यवहार केला आहे. बेशिस्त पणे अँटी रोडच्या मध्यभागी धांववुन प्रवासाना चढ-उतार करणारे ॲटोरिक्षाचालकावर, फ्रंटशिट घेणाऱ्या अँटोरिक्षाचालकावर, वाहन चालवताना मोचाईलवर बोलणारे (रनिंग मोबाईल) वाहनावर दररोज केसेस केल्या जात असून ॲटोमध्ये फ्रंटझिटचे दंडासह मागील संपूर्ण अनपेड दंड वसुल करण्याची धडक मोहिम चालू आहे, १) वाहतूक शाखेकडून सिग्नल कैम्प रोडवर, किडा संकुल, लातूर समोर औसा रोड तसेच गंजगोलाई परिसरातील पेचौल रस्त्यावर लागणारी हातगाडे समोर लावण्यात येणारे दुचाकी, चारचाकी वाहनांवर १५ दिवस विशेष मोहीम राबवून ई-चालान मशिनव्दारे दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार आहे.

२) दिनांक ०६/११/२०२५ रोजी ॲटोरिक्षा यांच्या मागील ई-चलान मशिनव्वारे दंडात्मक कारवाई केलेला पूर्वाचा दंड वसूल करण्याबाबत विशेष मोहीम राबवण्यात आली, तसेच टेप साऊड, ब्लॅक फिल्म, वाहन चालवताना मोवाईल फोनवर बोलणा-याविरुध्द सोबत विना लायसन वाहन चालविणे/विना लासयन्स वाहन चालविण्यास देणे, टिवल सीट, कर्कष्य हार्न वाजविणारे चालक, मोठे आवाज करणारे सायान्सर बचिणे, वाहतूक चिन्हाचा भंग करणारे, नंबर प्लेट नसणे हेल्मेट नसणे, मोटार सायकल चे कागदपत्र सोचत न बाळगणारे, ईतर सदराखालील प्रकरणास मोटार वाहनाखाली तसेच अँटो बालक हा गणवेष परिधान करणाऱ्या ॲटोरिक्षा चालकांवरही कड़क कार्यवाही चालू असुन १९९ इतर वाहनावर तसेच ॲटोरिक्षा केसेस करण्यात आल्या असून १,७८,२००/-रुपये दंड आकारण्यात आला आहे. ३) इंटर सेप्टर वाहनाव्दारे ओव्हर स्पीड केसेस ६२ केसेस एकूण देह १,२४,०००/- रूपये करण्यात आले. ४) ज्या ॲटोचे अनपेड ई-चालान भरणे थकीत असलेले केसेसचा दंड (सॅन्ड टू कोर्ट करून) मा. न्यायालयात त्यांचे विरुद्ध खटले दाखल करण्यात येत आहेत. मुख्य चौकामध्ये ५० ते ७५ मिटर अंतराचे आत धांवणारे वर व कोठेही धांवून बेशिस्तपणे प्रवासी चढ-उत्तारकरणारेवर वाहनाचर भारतीय न्याय संहीता कलम-२८५ प्रमाणे मा. वरिष्ठांचे आदेशान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनात लातूर पोलीस व वाहतुक नियंत्रण शासीचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार पांचे कडून कडक कार्यवाही करण्याची मोहिम राबवित आहोत, लातूर जिल्हा पोलीस दलातर्फे जनतेस अवाहन करण्यात येत आहे. लातूर शहरातील ॲटो रिक्षा, खाजगी दुचाकी व चार चाकी वाहनधारकांनी व जनतेनी वाहतुकीचे नियमन पाळून वाहनाची कागदपजे सोचत ठेवाचे असे आवाहन करण्यात येते आहे. ही मोहीम आणखी तीव्र होणार असून त्यानंतरही कायम चालु राहणार आहे. सदरची मोहीम ही लातूर शहरात तसेच पोलीस स्टेशनचे पोलीस यांच्याकडून कायम राबविली जाणार आहे. असे वाहतुक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विठ्ठल वराडे पानी सांगीतले.

---

### लातूर जिल्हा हादरलाः पोलीस विभागाची दमदार कामगिरी

# संबंधितांचा बे -जबाबदारपणा नागरिकांच्या जिवावर बेतला

लातूर (प्रतिनिधी) : याचावत अधिक माहिती अशी की, दि.०६/११/२०२५ रोजी श्री. समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, जुन्या रेल्वे स्टेशनच्या मोकळया पाकीगमध्ये एक इसम कारमध्ये वसून काहीतरी नशा करीत असल्याची खात्रीशिर बातमी मिळाल्यावरून त्या ठिकाणी पोलीसांनी पंचासह जावुन छापा मारला असता एक इसम नशा करीत असता तेथे एक इसम नशा करताना मिळून आला. त्यांची पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचे ताब्यात नशेथे साहीत्य १) हे घटक असलेले १ विनाप्रिस्क्रीप्शन विकण्यास बंदी असलेली गुंगीकारक १० गोळ्यांची स्ट्रीप, २) इंजेक्शन सिरींज, ३) एका कापडी पिशवीत वायआ गोळयांची स्ट्रीप, ४) एक प्रेसींग बॉल, ५) तीन लायटर, ६) नशा करण्याकरीता हाताला बांधण्याकरीता वापरला जाणारा एक काळा व एक लाल बेल्ट, ७) दोन काचेच्या चंचु आकाराच्या नळया (चिल्लम), ८) रक्ताचे डाग लागलेले कपडयाचे तुकडे, ९) हे घटक असलेले १ विनाप्रिस्क्रीप्शन विकण्यास बंदी असलेली गुंगीकारक गोळयांची रिकामी स्ट्रीप, १०) एक स्टीलचा ग्लास, ११) एक इंजेक्शची न वापरलेली सुई इ. साहीत्य मिळुन आले. सदर इसमास गुंगीकारक औषधांचे प्रिस्क्रीप्शनचावत विचारणा केली असता त्याने प्रिस्क्रीप्शन नसल्याचे सांगून सदरचे गुंगीकारक औषध विना प्रिस्क्रीप्शन शिवाय गेले ०३ महीण्यापासुन गांधी चौकातील चारद मेडीकल मधुन खरेदी करत असल्याचे सांगीतले. त्यावरून पोह/महेश पारडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वारद मंडीकलचा मालक गांधी चौक, लातूर याचंविरूध्व पोस्टे गांधी चौक, लातूर येथे गुरनं. ५१६/२०२५ क.१२३ वीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. तसेच लातूर शहरात अवैधपणे गुंगीकारक औषधे प्रिस्क्रीप्शनशिवाय विक्री करणाऱ्या मेडीकलवर कारवाई करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे,

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस अधिक्षक, लातूर व श्री. मंगेश चव्हाण, अपर पोलीस अधिक्षक, लातूर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर यांनी व त्यांचे कार्यालयातील पोलीस अंमलदार महेश पारडे, अरविंद बाघमोडे, गणेश मोरे, राहुल क्षिरसागर, रबिसन जाधव यांनी केली आहे.

---

# लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर (प्रतिनिधी) : कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत.

हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ६ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते २० नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील.

व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

---

# शैक्षणिक कर्ज अंतर्गत ; जिल्हा बँकेकडून शेतकऱ्यांच्या ५ मुलांना ४८ लाख रुपये मंजुर

लातूर (प्रतिनिधी) : राज्यांत नावलौकिक असलेल्या लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून शैक्षणिक कर्ज योजना अंतर्गत जिल्ह्यातील ५ शेतकरी सभासदांना उच्च शिक्षणासाठी ४८ .३३ लाख रुपये आज गुरुवारी झालेल्या बँकेच्या बैठकीत मंजुरी देण्यात आल्याची माहिती जिल्हा बँकेचे अध्यक्ष धीरज विलासरावजी देशमुख यांनी दिली आहे आजतागायत जिल्हा बँकेकडून शैक्षणिक कर्ज अंतर्गत ४६४ शेतकऱ्यांच्या मुलांना २१.६६ कोटी रुपये कर्ज वाटप आलेली आहेत यात परदेशात शिक्षण घेणाऱ्या ३४ शेतकरी मुलांना ५.२६ कोटी रुपये कर्ज वाटप करण्यात आली आहेत लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून विविध योजना राबवून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम करीत असून वेगवेगळ्या योजना राबवून शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करत असताना शेतकऱ्यांची मुल उच्च शिक्षण घ्यावेत त्यांना आर्थिक मदत व्हावी यासाठी जिल्हा बँक सतत पुढाकार घेत असते उच्च




शिक्षण अंतर्गत किंवा देशांतर्गत किंवा परदेशातील शिक्षणासाठी बँक कर्ज पुरवठा करत असुन त्यात वैधकीय पदवीधर , व पदव्युत्तर, इंजीनियरिंग पदवीधर, स्थापत्य विशारद पदवीधर, वा पदव्युत्तर, एम बी ए, औषधशास्त्र पदवीधर, शिक्षणासाठी बँकेकडून कर्ज मंजुरी दिली जात असून यासाठी शैक्षणिक कर्ज मर्यादेसाठी ८ लाख रुपये,देशांतर्गत वैधकीय पदवीधर यासाठी २० लाख रुपये, वैधकिय पदव्युत्तर शिक्षणासाठी ३० लाख , तर देशाबाहेरील कोर्सेससाठी २५ लाख रुपयांपर्यंत बँकेकडून शैक्षणीक कर्ज पुरवठा होत आहे अशी माहिती जिल्हा बँकेचे चेअरमन माजी आमदार धीरज विलासरावजी देशमुख यांनी दिली आहे.

## संपादकीय

### धूम मचाले धूम...

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या उपटसुंभ धोरणांना खुद्द अमेरिकेतच किती कडवा विरोध आहे, याचा प्रत्यय नुकत्याच झालेल्या काही निवडणुकींच्या निकालावरून सगळ्या जगाला आला असेल. या निवडणुकांत न्यूयॉर्कच्या महापौर पदाची निवडणूक सगळ्यात महत्त्वाची होती. न्यूयॉर्कचं जागतिक स्थान नव्याने सांगायला नको. सगळ्या जगातून लोक या शहरात आले आहेत. शिवाय, जगातील सर्वाधिक श्रीमंतही याच शहरात राहतात. न्यूयॉर्क नेहमीच जागतिक घडामोडींच्या केंद्रस्थानी असतं. ट्रम्प यांनी त्यामुळे तिथली निवडणूक खूपच प्रतिष्ठेची केली होती. न्यूयॉर्कच्या महापौर पदाच्या निवडीचा संबंध त्यांनी थेट अमेरिकेच्या जागतिक प्रतिष्ठेशी जोडला होता. आधी 'अमेरिकन' म्हणून आणि त्यानंतर वेगवेगळे धार्मिक गट म्हणून त्यांनी न्यूयॉर्कच्या मतदारांच्या अस्मिता परस्परांविरोधात पेटवण्याचा जोरदार प्रयत्न केला. पण, न्यूयॉर्कच्या मतदारांनी ट्रम्प यांच्या असल्या कोणत्याच प्रयत्नांना भीक घातली नाही. मूळच्या भारतीय असलेल्या, 'मान्सून वेडिंग'सारखा चित्रपट करणाऱ्या विख्यात दिग्दर्शिका मीरा नायर यांच्या मुलाला, जोहरान ममदानी यांना न्यूयॉर्कच्या मतदारांनी बहुमताने निवडून दिलं. एकूण २०.५५ लाख मतदारांपैकी १०.३६ लाख मतदारांनी ममदानी यांच्या पारड्यात आपलं मत टाकलं. ममदानी ज्या पक्षाचे उमेदवार होते, त्याच पक्षाचे बंडखोर उमेदवार अँड्र्यू क्युमो यांना ८.५४ लाख मतं मिळाली. उर्वरित मतं ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवाराला मिळाली. ती किती कमी असतील, याचा अंदाज आपल्याला या आकडेवारीवरून येईल. सर्वाधिक श्रीमंत जिथे राहतात, त्या न्यूयॉर्कच्या मतदारांसमोर ममदानी भोजन, महागाई आणि निवाऱ्याचा, गरिबांचा जाहीरनामा घेऊन गेले आणि तरीही त्यांना नागरिकांनी भरभरून मतदान केलं. यावरून ट्रम्प यांचा निषेध नोंदवण्याची तिथल्या जनतेची आस किती तीव्र आहे, हे लक्षात येतं.या निवडणुकांमध्ये विजयी झालेले ममदानी हे एकटेच मूळ भारतीय नाहीत. वर्जिनिया आणि न्यू जर्सीच्या गव्हर्नर पदाच्या निवडणुकीतही ट्रम्प यांच्या पक्षाच्या उमेदवारांचा दणदणीत पराभव झाला. वर्जिनीयामध्ये डेमोक्रॅटिक पक्षाच्या गजाला हाश्मी आणि ओहायोतल्या सिनसिनाटी शहराच्या महापौरपदी आफ्ताब पुरेवाल निवडून आले. पुरेवाल यांनी तर अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हेन्सच्या सावत्र भावाचा, कोरी बोमन यांचा पराभव केला. ममदानी यांनी निवडून येता येता बरेच विक्रमही केले. न्यूयॉर्कच्या महापौर पदावर विराजमान होणारे ते पहिले मूळ भारतीय आहेत. पहिले मुस्लीम आहेत आणि गेल्या १०० वर्षांतील सर्वात तरुण महापौर आहेत! वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षी ते न्यूयॉर्क शहराचे १११ वे महापौर झाले आहेत. न्यू जर्सीमध्ये पहिल्यांदा कोणी महिला उमेदवार पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मतं घेऊन विजयी झाली आहे. अमेरिकेतली ती सर्वात खर्चिक निवडणूक ठरली आहे. तिथे प्रचारावर तब्बल १ हजार ६६० कोटी रुपये खर्च झाले. २००५ मध्ये न्यू जर्सीमध्ये १ हजार १९७ कोटी रुपये खर्च झाले होते! अमेरिकेच्या पन्नास राज्यांपैकी २४ राज्यांत आता डेमोक्रॅटिक गव्हर्नर असून २६ राज्यांत रिपब्लिकन गव्हर्नर आहेत. देशातल्या आपल्या पक्षाच्या या काठावरच्या बहुमताकडे ट्रम्प यांनी वेळीच काळजीपूर्वक पाहिलं नाही, तर आणखी बरोब्बर एक वर्षाने, पुढच्या नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या मध्यावधी निवडणुकीत ट्रम्प यांच्या वर्चस्वाला सुरुंग लागलेला असेल. आपल्याबरोबरच आपल्या पक्षाला घेऊन ट्रम्प बुडतील. एखाद्या राष्ट्राध्यक्षांच्या विरोधात जनमत जाणं अमेरिकेसाठी नवं नाही. ते ज्या वेगाने आणि ज्या तीव्रतेने विरोधात जात आहे, ते जास्त चिंताजनक आहे. ट्रम्प यांच्या घोषणांतील पोकळपणा तिथल्या जनतेने ओळखल्याचं हे द्योतक आहे. अमेरिकनांनीच ट्रम्प यांच्यावर असा अविश्वास दाखवला, तर त्यांच्या जगभर चाललेल्या अनावश्यक उठाठेवींना आपोआपच आळा बसण्याची शक्यता आहे. त्यातला जोर जाईल. ट्रम्प यांचा आत्मविश्वास डळमळीत होईल. ट्रम्प यांची दादागिरी जगात कोणीच चालू देणार नाही. पाकिस्तानचा अपवाद सोडून! अमेरिकेतले डेमोक्रॅटिक आणि रिपब्लिकन हे दोन्ही पक्ष कमीअधिक भांडवलदारीच आहेत. ममदानी यांचं वैशिष्ट्य असं, की त्यांनी उघडपणे लोकशाही समाजवादी असल्याचं सांगितलं आणि त्याच भूमिकेवर निवडणूक लढवली. ट्रम्प यांनी त्यांच्यावर कम्युनिस्ट शिक्का मारण्याचा प्रयत्न केला. पण, मतदारांनी त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केलं. ममदानी साम्यवाद्यांची शासन नियंत्रित अर्थव्यवस्था मांडत नसून त्यांच्या अजेंड्यामध्ये न्यायाच्या कल्पना आहेत, हे तिथल्या मतदारांनी मान्य केलं. ममदानी हे मुस्लीम असल्याने, पॅलेस्टाईनचे कट्टर समर्थक असल्याने तिथे मोठ्या प्रमाणावर असलेला ज्यू समाज त्यांना मतदान करणार नाही, हा ट्रंप यांचा विश्वासही ज्यू मतदारांनी सपशेल खोटा ठरवला. सर्व लहान मुलांसाठी मोफत बालसंगोपन केंद्रं, अनुदानित घरांच्या भाडेवाडीला प्रतिबंध, सरकारी बसमध्ये सर्वांना मोफत प्रवास आणि जीवनावश्यक वस्तूंची सरकारी दुकानं - या ममदानी यांच्या जाहीरनाम्याला लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला. आपल्याला, आपल्या आवाहनांना आणि अजेंड्याला लोकांनी नाकारलं, हे ट्रम्प यांच्या पचनी पडणं शक्यच नाही. त्यामुळे, त्यांनी 'मतपत्रिकेवर माझं छायाचित्र नव्हतं' असं लंगडं कारण पुढे करून त्यामुळे, रिपब्लिकन उमेदवारांचा पराभव झाला, असं सांगण्याचा प्रयत्न चालवला आहे.

# विद्यार्थी दिन : शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक परिवर्तनाचा प्रवास



७ नोव्हेंबर हा भारतीय सामाजिक इतिहासात एका महत्त्वपूर्ण स्मरणदिनी म्हणून आपल्याला परिचित आहे. हा दिवस केवळ दिनदर्शिकेतील एक तारीख नाही, तर स्वाभिमान, समता, शिक्षण आणि मानवी प्रतिष्ठेच्या संघर्षाची एक निर्णायक सुरुवात दर्शविणारा दिवस आहे. सन १९०० रोजी या दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रथमच सातारा येथील प्रतापसिंह हायस्कूल या शाळेत दाखल झाले. परंतु हा केवळ एखाद्या व्यक्तीचा शाळेत प्रवेश नसून, भारतीय समाजातील अस्पृश्यतेच्या भिंतींना हादरा देणारा आणि 'शिक्षण हेच मुक्तीचे शस्त्र' अशी घोषणा करणाऱ्या एका ऐतिहासिक परिवर्तनाचा प्रारंभ होता. म्हणूनच, या दिवसाचे 'विद्यार्थी दिन' म्हणून साजरे होणे हे शिक्षणाचे महत्व, त्यातील मूल्ये, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यातील भूमिका आणि समाजातील बदलाच्या प्रक्रियेसाठी शिक्षण किती अपरिहार्य आहे, हे अधोरेखित करणारे आहे.

भारतीय समाजाची रचना दीर्घकाळापासून असमानता, वर्णव्यवस्था आणि सामाजिक स्तरभेद यांच्या आधारे झालेली होती. शिक्षण हे ज्ञानाचे साधन असून, ज्ञान हेच व्यक्तीचे सशक्तीकरण करणारे सर्वात प्रभावी साधन आहे, याची जाण ज्यांच्या हाती होती त्यांनी शिक्षणावर नियंत्रण ठेवून समाजातील दुर्बल, वंचित आणि दबलेल्यांना ज्ञानापासून जाणीवपूर्वक दूर ठेवले. या पार्श्वभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळाप्रवेश हा एक सामाजिक क्रांतीचा अंकुर होता. हा दिवस केवळ स्मरणाचा दिवस नाही, तर विद्यार्थी या संकल्पनेचा सामाजिक अर्थ पुन्हा ठरविण्याचा, विद्यार्थ्याच्या अस्तित्वाचा गौरव करण्याचा आणि शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे मूलभूत साधन म्हणून पुन्हा अधोरेखित करण्याचा दिवस आहे.

विद्यार्थी दिन साजरा करण्यामागील मूलभूत उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये स्वतःबद्दलची जागरूकता, सामाजिक जबाबदारी, मूल्याधिष्ठित जीवनदृष्टी, आणि ज्ञानाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाची प्रेरणा निर्माण करणे. शिक्षणाचा उद्देश केवळ नोकरी मिळविणे किंवा आर्थिक स्थैर्य प्राप्त करणे एवढाच मर्यादित नाही. शिक्षण व्यक्तीला विचारस्वातंत्र्य, विवेकबुद्धी, आत्मभान आणि सामाजिक न्यायासाठी लढण्याची ताकद प्रदान करते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाचे महत्त्व आत्मसात केले आणि आपल्या संपूर्ण जीवनातून शिक्षण, संघटना आणि संघर्ष या तीन तत्त्वांवर समाजाला चलनवलन देणारी प्रेरणा दिली. विद्यार्थी हा समाजाचा पाया आहे. पायाच जर मजबूत असेल तर संपूर्ण संरचना स्थिर व सक्षम राहते. म्हणूनच विद्यार्थ्यांनी समाज, इतिहास, संस्कृती, राजकारण, अर्थव्यवस्था आणि मानवी मूल्ये याविषयी जागरूक असणे अत्यंत आवश्यक आहे.

सध्याच्या काळात विद्यार्थ्यांपुढे अनेक आव्हाने आहेत. जागतिकीकरण, तंत्रज्ञानातील प्रगती, स्पर्धावृत्ती, बेरोजगारी, मानवी मूल्यांची घट आणि मानसिक आरोग्यावर वाढता ताण ही काही प्रमुख आव्हाने म्हणता येतील. परंतु, विद्यार्थी म्हणजेच परिवर्तनाची शक्ती असून तो परिस्थिती बदलविण्याची क्षमता बाळगून असतो. इतिहास साक्षीदार आहे की, सर्वांत मोठ्या क्रांती, आंदोलनं आणि सामाजिक चळवळी विद्यार्थी वर्गाच्या सहभागामुळेच उभ्या राहिल्या आहेत. स्वातंत्र्यलढ्यात असो, आपत्ती व्यवस्थापनात असो किंवा समाज सुधार चळवळीत असो विद्यार्थ्यांनी नेहमीच पुढे राहून समाजाला योग्य दिशा दिली आहे.

या पार्श्वभूमीवर 'विद्यार्थी दिन' साजरा करणे म्हणजे विद्यार्थ्यांना त्यांच्या ओळखीची, कर्तव्याची आणि सामर्थ्याची जाणीव करून देणे होय. विद्यार्थी हे सामाजिक परिवर्तनाचे वाहक आहेत. त्यांच्यातील विचारांची उंची, दृष्टिकोनाची व्यापकता आणि मनोवृत्तीची सकारात्मकता समाजाला नवीन दिशादर्शन करू शकते. म्हणूनच शिक्षणसंस्था, कुटुंब, समाज आणि शासन या सर्व आघाड्यांवर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वातावरण निर्माण केले पाहिजे. शिक्षण हे मूल्याधिष्ठित, मानवतावादी आणि न्यायनिष्ठ बनले पाहिजे.

आपल्या देशात अजूनही अनेक मुले शिक्षणापासून वंचित आहेत. ग्रामीण भागात, आदिवासी समाजात, कुपोषण, गरीबी, मुलींच्या शिक्षणातील अडथळे, बालमजुरी, अपुरी शैक्षणिक साधने, आणि डिजिटल दरी ही शिक्षणापुढील गंभीर आव्हाने आहेत. या समस्यांच्या मुळाशी सामाजिक असमानता, विषमता आणि आर्थिक दुर्बलता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला समाजातील विषमता दूर करण्याचे सर्वात प्रभावी साधन मानले. म्हणूनच विद्यार्थी दिनाच्या निमित्ताने आपण शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध, समान, गुणवत्तापूर्ण आणि मूल्याधिष्ठित करण्याची प्रतिज्ञा घेतली पाहिजे.

विद्यार्थी हा केवळ पुस्तकांचा अभ्यास करणारा घटक नाही. विद्यार्थी म्हणजे ज्याच्यात प्रश्न विचारण्याची क्षमता आहे. प्रश्न विचारणे म्हणजेच विचारप्रक्रियेची सुरुवात होय. विचार करण्याची क्षमता हा मानवी संस्कृतीचा पाया आहे. मनुष्यामध्ये इतर प्राण्यांपेक्षा वेगळे काय असते तर ते म्हणजे विचार करण्याची आणि विश्लेषण करण्याची क्षमता. त्यामुळे विद्यार्थी दिन हा प्रश्न विचारण्याचा, संशोधन करण्याचा, जिज्ञासा जागविण्याचा दिवस आहे.

सध्याच्या काळात काही ठिकाणी शिक्षणाचे व्यापारीकरण होताना दिसते. ज्ञान हे विक्रीच्या वस्तूसारखे मांडण्याची प्रवृत्ती वाढताना जाणवते. अशा परिस्थितीत विद्यार्थी दिन आपल्याला शिक्षणातील मूल्यांची आठवण करून देतो. शिक्षण हे समाजातील प्रत्येक घटकाचे मूलभूत हक्क आहे. शिक्षणाचे उद्दिष्ट समाजाला नैतिक, संवेदनशील, सक्रिय आणि प्रगतिशील बनविणे हे आहे. ज्ञानाचा वापर स्वतःच्या प्रगतीसाठी तर करायचाच आहे, पण त्याचबरोबर समाजातील दुर्बल, शोषित आणि वंचित घटकांसाठी संवेदनशील होणे हेही विद्यार्थी असण्याचे आवश्यक मूल्य आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विद्यार्थ्यांना नेहमी सांगितले होते की शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. या संदेशात विद्यार्थ्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडविण्याचे तत्त्व आहे. शिक्षणाने तुम्हाला बौद्धिक सामर्थ्य मिळते, संघटना तुम्हाला सामूहिक ताकद देते आणि संघर्ष तुम्हाला प्रतिकूलतेवर मात करण्याची तयारी करून देतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाकडे केवळ परीक्षा किंवा गुणांच्या दृष्टीने पाहू नये. तर शिक्षण हे समाज बदलण्याचे साधन मानून त्याचा उपयोग व्यापक हितासाठी केला पाहिजे.

आज भारताची युवा पिढी जगातील सर्वांत मोठी आहे. युवा म्हणजेच विद्यार्थी वर्ग. ही संख्या भारतासाठी संधी आहे. ही संधी समाजाच्या आणि राष्ट्राच्या विकासासाठी वापरायची की फक्त स्पर्धा, ताण आणि बंदिस्त शिक्षण मॉडेलमध्ये हरवायची, हा निर्णय आज आपणच घ्यायचा आहे. विद्यार्थी दिनाचे औचित्य साधून आपण विद्यार्थ्यांना मुक्त, विचारशील, आत्मनिर्भर, समतावादी आणि सर्जनशील बनविण्याची दिशा निश्चित केली पाहिजे.

विद्यार्थ्यांचे शिक्षण हे केवळ वर्गखोल्यांमध्ये होणारे शिक्षण नाही. समाज, निसर्ग, संस्कृती, इतिहास, कलेची परंपरा, लोकजीवन, तांत्रिक प्रगती, लोकशाही मूल्ये, संविधानाचे तत्त्वज्ञान ही सर्व शिक्षणाची पाठशाळा आहेत. विद्यार्थी हे या सर्वांशी संवाद साधू लागला की त्याची दृष्टी व्यापक होते. या दृष्टीतूनच परिवर्तनाची बीजे उगवतात.

शेवटी, विद्यार्थी दिन हा केवळ कार्यक्रम साजरा करण्याचा दिवस नाही. हा चेतनेचा दिवस आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळाप्रवेशापासून सुरू झालेली इतिहासाची वाटचाल आजही आपल्याला समानतेच्या, न्यायाच्या आणि ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जाते. आजही अनेकांना शिक्षणाचे दरवाजे पूर्णपणे उघडलेले नाहीत. त्यामुळे हा दिवस नवीन संकल्पांची प्रेरणा देतो. शिक्षण सर्वांसाठी, समान संधी सर्वांसाठी आणि सामाजिक न्याय हा शिक्षणाचा आधार आहे.

विद्यार्थी दिनाच्या या शुभप्रसंगी, प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या अंतरात्म्यातील जिज्ञासेला जागे करावे, सामाजिक प्रश्नांना समजून घ्यावे, संवेदनशील मन ठेवावे आणि आपले शिक्षण समाजाच्या भल्यासाठी वापरावे. आपण सर्वांनी मिळून असे समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावा की जिथे प्रत्येक बालक, प्रत्येक युवक आणि प्रत्येक विद्यार्थी हे सांगू शकतील की शिक्षण माझा अधिकार आहे, ज्ञान माझी शक्ती आहे आणि समाज परिवर्तन माझे ध्येय आहे. याच सत्याची पुनः प्रचीती करून देणारा, ज्ञान, समता आणि प्रगतीचा दीप पेटवणारा ७ नोव्हेंबर हा 'विद्यार्थी दिन' सर्वांना प्रेरणादायी ठरो यासाठी सर्वांना हार्दिक शुभेच्छा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन....

**–डॉ. राजेंद्र बगाटे (समाजशास्त्राचे अभ्यासक)**
**मो. ९९६०१०३५८२,**

# औरंगाबाद विभाग पदवीधर विधानपरिषद मतदार संघांच्या नव्याने तयार करण्यात येत असलेल्या मतदार यादीच्या संदर्भात महत्वाचा खुलासा

छत्रपती संभाजीनगर दि. ६: भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार औरंगाबाद विभाग पदवीधर विधान परिषद मतदार संघाची मतदार यादी नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम सुरु आहे. मतदार नोंदणी ही निरंतर चालणारी प्रक्रिया असुन दि.०६ नोव्हेंबर २०२५ रोजी पर्यंत प्राप्त झालेल्या मतदारांची प्रारुप मतदार यादी दि.२५ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच प्रारुप यादीबाबत दावे व हरकती सादर करण्यास संधी देवून त्यावर निर्णय घेवून दि.३० डिसेंबर २०२५ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

विधानपरिषदेच्या सदर जागा डिसेंबर २०२६ मध्ये रिक्त होणार आहेत. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५० मधील तरतूदीनुसार मतदार यादयामध्ये संबंधित निवडणूकांकरीता नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत सुधारणा, नव्याने समावेशन किंवा वगळणी करता येते. सबब उपरोक्त नमूद पदवीधर विधानपरिषद मतदार संघाच्या मतदार याद्या दि.३० डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्यानंतरही त्या याद्यामध्ये ऑफलाईन तसेच ऑनलाईन पद्धतीने नव्याने नाव समाविष्ट करण्याची संधी पात्र मतदारांना संबंधित निवडणूकांच्या नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत उपलब्ध असणार आहे, असे ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या सहायक मतदार नोंदणी अधिकारी मंजूषा मिसकर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

# वंचित घटकांतील मुलांना शिक्षण देत घडवण्याचे शिक्षकांचे कार्य अमूल्य

## जिल्हा परिषद प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांचे प्रतिपादन कार्यकर

सोलापूर (प्रतिनिधी) : समाजात अनेक मुले शिक्षणापासून वंचित आहेत. गोर गरीब, वंचित घटकातील मुले मुली महापालिकेच्या शाळेत शिक्षण घेतात. या वंचित घटकांतील मुलांना शिक्षणाचे धडे गिरवत त्यांना घडवण्याचे अमूल्य कार्य महापालिका शिक्षकांचे आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषद प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी केले.शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त सोलापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ पार पडला,यासंगी सर्व



सह शिक्षक विशाल मनाळे यांना (सायकलिंग व पर्यावरण रक्षक) (मनपा शाळा क्रमांक ०४) या पुरस्कारांने सन्मानित करण्यात आले.

विभागात कार्यरत शिक्षकांपैकीपालिका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या शिक्षक पुरस्कार वितरणआनंद सामल (मनपा मराठी मुलांची शाळा कॅम्प), संतोष सुतार (मनपा मुलांची शाळा देशमुख वस्ती), दत्तात्रेय चौगुले (मनपा मराठी मुलांची शाळा क्रमांक २५), उमाचंदनशिवे (मनपा मराठी मुलांची शाळा क्रमांक ०४), लक्ष्मी हळगोदे (मनपा मराठी मुलांची शाळा क्रमांक १०), गणेश उप्पलम, (म.न. पातेलुगु शाळा क्र.४), मंगल शिंगे (मनपा कन्नड शाळा बारद मड्डी), फुरकानुलक पानगल (मनपा उर्दू मुले चिरागअली), शबाना शेख (मनपा उर्दू मुले क्रमांक ६), शुगुफ्ता प्यारे (मनपा उर्दू मुले ०९), रहिमा शेखा (मनपा उर्दू मुले हेडक्वार्टर), आयेशा शहापुरे (मनपा उर्दू मुली संगमेश्वर नगर), विशाल मनाळे (सायकलिंग व पर्यावरण रक्षक) (मनपा शाळा क्रमांक ०४).बारा शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार व एका शिक्षकास विशेष गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्यमागासवर्गीय शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष शामराव जवंजाळ, राजेश पारखे, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष शशिकांत कांत खुडे, सचिव किरण सगेल आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# विलास साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचे बॉयलर अग्निप्रदिपन संपन्न





## ८ लाख मे. टन गाळपाचे उद्दिष्ट

लातूर (प्रतिनिधी) : शुक्रवार, ७ नोव्हेंबर २०२५: या वर्षी कार्यक्षेत्रात ऊसाची उपलब्धता मोठया प्रमाणात आहे. याअनुषंघाने गळीत हंगामात उच्चांकी ऊसाचे गाळप आणि ऊच्चांकी साखर ऊतारामिळवण्यासाठी साखर कारखाना प्रशासनाने सज्ज रहावे, असे आवाहनकारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख यांनी केले.विलास सहकारी साखर कारखाना लि., वैशालीनगर, निवळी कारखान्याच्या गळीतहंगाम सन २०२५-२६ चे बॉयलर अग्निप्रदिपन शुक्रवार, ७ नोव्हेंबर रोजीसकाळी ११ वाजता कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुखयांच्या हस्ते सर्व संचालकांच्या उपस्थितीत करण्यात आले यावेळी त्याबोलत होत्या.

यावर्षी मृगासह परतीचा पाऊस चांगला झाला आहे. यामुळे कारखानाकार्यक्षेत्रासह जिल्हयात ऊसाचे क्षेत्र वाढले आहे. कार्यक्षेत्रातीलऊसाचे क्षेत्र पाहता कारखाना हंगाम यशस्वीपणे पार पडण्यासाठी जय्यत तयारीकरण्यात आली आहे. सुरु होत असलेल्या गळीत हंगामातील ८ लाख मे. टन ऊसाचेगाळप उदिष्टय साध्य करण्यासाठी कारखाना सज्ज केला असून गळीत हंगामातकारखाना पूर्ण क्षमतेने चालावा, हंगाम सुरु असतांना तांत्रीक कारणानेकारखाना बंद राहणार नाही यासाठी हंगाम बंद काळातील कामे चांगल्या प्रकारेकरण्यात आली आहेत. कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्तेसर्व संचालकांच्या उपस्थितीत बॉयलर अग्निप्रदिपन कार्यक्रम प्रसंगीलोकनेते विलासराव देशमुख यांच्या पुतळयास अभिवादन करण्यात आले. तसेच नवीनहार्वेस्टरचे पूजनही यावेळी करण्यात आले.यावेळी व्यासपीठावर विलास कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासरावदेशमुख, व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे, ट्वेन्टीवन शुगर्सचे व्हा.चेअरमनविजय देशमुख, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील, कार्यकारी संचालकआत्माराम पवार, संचालक सर्वश्री रविंद्र काळे, अमृत जाधव, सतिश शिंदे(पाटील), अनंत बारबोले, नरसिंग बुलबुले, नितीन पाटील, रंजीत पाटील, रसुलपटेल, तात्यासाहेब पालकर, हणमंत पवार, नेताजी साळुंके (देशमुख), रामरावसाळुंके, दिपक बनसोडे, लताबाई देशमुख, शाम बरुरे, सुभाष माने व रमेशदेशमुख उपस्थित होते.

कार्यक्रम प्रसंगी चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख पूढे बोलतांनाम्हणाल्या, विलास कारखानाची वाटचाल पाहून आदरणीय साहेबांच्या धोरणाप्रमाणे त्यांचे कार्य पूढे जात आहे हे पाहून आनंद होत आहे. आम्ही तुमचेआहोत आणि तुम्ही आमचे आहात आपली कोणतीही अडचण असल्यास तुम्ही हाक मारा,आम्ही आपल्या मदतीला धावून येऊ असे सांगीतले.यावेळी व्हा. चेअरमन वैजनाथराव शिंदे यांनी गळीत हंगाम यशस्वीपणे पारपाडण्यासाठी शुभेच्छा दिल्या. लातूर जिल्हयामध्ये सहकार आणि साखर उदयोगआपल्या नेतृत्वाने उभा केला या माध्यमातून आपला सर्वांचा विकास झाला आहे. यामध्ये साखर कारखान्याचे योगदान मोलाचे आहे. यामुळे येणाऱ्या हंगामातचांगले गाळप होण्यासाठी सर्वांनी योगदान दयावे असे आवाहन त्यांनी यावेळीकेले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांनी केले,यावेळी बोलतांना ते म्हणाले, गळीत हंगामाची जय्यत तयारी झाली आहे.कारखाना तांत्रीकदृष्टीने बंद राहणार नाही यांची काळजी घेऊन गाळप उदीष्टयपूर्ण केले जाईल. तसेच या वर्षीच्या हंगामात विक्रमी गाळपाचे आणि साखरउताराचे उदीष्टय साध्य करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. प्रारंभी विलास साखर गणेशोत्सव मंडळाकडून कर्मचाऱ्यासाठी घेण्यात आलेल्याक्रिकेट स्पर्धा, रस्सीखेच स्पर्धांतील विजेत्यांना आणि कर्मचाऱ्यांच्यागुणवंत पाल्यांना चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्या हस्ते पारीतोषिकदेण्यात आले. तसेच बॉयलर अग्नी प्रदिपन प्रसंगी बॉयलर अटेडंन्ट पद्माकरचौगुले, हनमंत शेडगे, सुर्यकांत माळी, जानुमियॉ शेख, दत्ता शिंदे यांचासत्कार करण्यात आला. बॉयलर अग्निप्रदीपन प्रसंगीची महापूजा संचालक हणमंतपवार आणि सौ. व्दारका पवार यांच्य हस्ते करण्यात आली.सुत्रसंचालन राहूल इंगळे यांनी केले तर आभार संचालक शाम बरुरे यांनीमानले. कार्यक्रमास सर्व सभासद, ऊसउत्पादक, ठेकेदार, अधिकारी, कर्मचारी,कामगार मोठया संख्येने उपस्थित होते.

# सकल ओबीसी व भटके विमुक्त महासंघाचा सोमवारी कलेक्टर कचेरीवर मोर्चा

## ॲड. प्रकाश आंबेडकर व लक्ष्मण हाके नेतृत्व करणार

जालना- हैदराबाद गॅजेट बाबतचा शासन अध्यादेश रद्द करावा, बोगस कुणबी प्रमाणपत्र रद्द करावे या व इतर मागण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर तसेच ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वाखाली सकल ओबीसी व भटके विमुक्त महासंघाच्या वतीने सोमवार दिनांक १० नोव्हेंबर रोजी जालना जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

जालना शहरातील गांधी चमन येथून दुपारी १ वाजता हा मोर्चा काढण्यात येणार आहे. राज्य शासनाने २ सप्टेंबर रोजी काढलेला हैदराबाद गॅजेट बाबतचा अध्यादेश रद्द करावा, बोगस कुणबी प्रमाणपत्र रद्द करावेत, जातिनिहाय जनगणना करण्यात यावी, शासकीय व निमशासकीय कार्यालयातील नोकरी विषयक अनुशेष भरावा, शासनाच्या समन्यायी तत्वानुसार ओबीसी - भटक्या विमुक्त महामंडळास आर्थिक तरतूद करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सदरील मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दिनांक १० नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता जालना शहरातील गांधी चमन येथून हा मोर्चा निघणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर तसेच ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके हे या मोर्चास उपस्थित राहणार आहेत.

जालना जिल्ह्यातील वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी तसेच कार्यकर्ते, सकल ओबीसी व भटके विमुक्त समाजाने या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष (पश्चिम) डेव्हिड घुमारे, पूर्वचे अध्यक्ष रामप्रसाद थोरात, सकल ओबीसी व भटके विमुक्त महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र वांजोळे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव प्रशांत कसबे, वंचितच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष रमाबाई होर्शिल, युवक आघाडीचे जालना जिल्हाध्यक्ष विजय लहाने, गजानन निलुडे, गौतम खंडागळे, हरीश रत्नपारखे आदींनी केले आहे.

# बीकेसीच्या धर्तीवर वडाळ्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक केंद्र

## एमएमआरडीए करणार १५० एकर जागेचा विकास




मुंबई : वडाळ्यातील आपल्या मालकीच्या १५० एकर जागेचा विकास वांद्रे-कुर्ला संकुलाच्या धर्तीवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक केंद्र म्हणून करण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे. त्यानुसार येथील भूखंडांचा ई लिलाव करून येथे व्यावसायिक आणि काही प्रमाणात निवासी संकुले उभारण्यात येणार आहेत. या निर्णयाच्या अंमलबजावणीला अखेर एमएमआरडीएने सुरुवात केली आहे. वडाळ्यातील भूखंड क्रमांक ४० चा ई लिलाव करण्यासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली. हा भूखंडाचे क्षेत्रफळ १०८६० चौरस मीटर असून या भूखंडावरील अनुज्ञेय बांधकाम १,०८,६०० चौरस मीटर क्षेत्र उपलब्ध होणार आहे. पात्र निविदाकाराला या भूखंडाचे ८० वर्षांसाठी भाडेतत्त्वावर वाटप करण्यात येणार आहे. एमएमआरडीए वडाळा येथील भूखंड क्रमांक ४० चा ई लिलाव करण्यासाठी गुरुवारी निविदा प्रसिद्ध केली. १०८६० चौरस मीटर क्षेत्रफळाचा भूखंड ८० वर्षांसाठी भाडेतत्त्वावर दिला जाणार असून या ई लिलावातून एमएमआरडीएला किमान १६२९ कोटी रुपये महसूल मिळण्याची शक्यता आहे. देशाची अर्थव्यवस्था पाच लाख कोटी डॉलरपर्यंत नेण्यासाठी केंद्र सरकारने चार महानगरांचा ग्रोथ हब म्हणून विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यात एमएमआर क्षेत्राचा समावेश आहे.

१५ वर्षांनंतर वडाळ्यातील भूखंडाचा ई लिलाव :

निविदेनुसार या भूखंडाच्या ई लिलावासाठी १,५०,००० रुपये प्रति चौरस मीटर असे राखीव दर निश्चित करण्यात आले आहेत. या राखीव दरानुसार एमएमआरडीएला या भूखंडाच्या ई लिलावातून किमान १६२९ कोटी रुपये इतका महसूल मिळणार आहे. दरम्यान, एमएमआरडीएने २००८ मध्ये वडाळ्यातील दोन भूखंडांच्या ई लिलाव करण्यासाठी निविदा काढल्या होत्या. मात्र आर्थिक मंदीमुळे या ई लिलावास प्रतिसाद न मिळाल्याने २०१० मध्ये याच भूखंडांसाठी पुन्हा ई निविदा काढल्या आणि त्यास प्रतिसाद मिळाला. लोढा समूहाने ४०५३ कोटी रुपयांत भूखंड खरेदी केले आणि त्यावर न्यू कफ परेड नावाने टाऊनशीप उभारली. आता १५ वर्षांनंतर वडाळ्यातील भूखंडाचा ई लिलाव करण्यात येणार आहे.

# कुंभमेळा पर्वणी काळात येणारे भाविक व वाहतूकीचे सूक्ष्म नियोजन करा-विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम

नाशिक,: आगामी सिंहस्थ कुंभमेळयात पर्वणी कालावधीत नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे देशभरातून मोठ्या संख्यने भाविक उपस्थित राहणार आहेत. यादृष्टीने रेल्वे, हवाई मार्ग, बसेस, कार यासह पायी येणारे भाविक, त्यांना इच्छीत स्थळी पोहचण्याची व्यवस्था, वाहनतळ व्यवस्था, गर्दीचे नियोजन व अनुषंगिक बाबी याबाबत सर्व यंत्रणांच्या समन्वयातून सूक्ष्म नियोजन करण्यात यावे, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिल्या.

या नियोजनाबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकाऱ्यांची मत-मतांतरे जाणून घेत चर्चा करण्यात आली. यावेळी कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री, पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, प्रकल्प अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अर्पिता ठुबे (नाशिक) यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त गेडाम म्हणाले की, प्रमुख पर्वणीच्या दिवशी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असणार आहे. यादृष्टीने रेल्वे, हवाई मार्ग, बसेस, कार या मार्गांनी येणाऱ्या भाविकांची अंदाजित संख्या गृहित धरून त्यानुसार नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी प्रयागराज येथे झालेल्या कुंभमेळाच्या धर्तीवर केलेले नियोजनाचा आधार घेत स्थानिक पातळीवरील अत्यावश्यक बाबी लक्षात घेवून नियोजन करावे लागेल. गर्दीचे नियोजन करतांना टप्प्याटप्प्यावर भाविकांसाठी पिण्याचे पाणी, भोजनाची उपलब्धता, आरोग्य सुविधांसह आवश्यक सोयी-सुविधा यास विशेष प्राधान्य देण्यात यावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी प्रयागराज येथे झालेल्या कुंभमेळा धर्तीवर तयार करण्यात आलेल्या पर्वणी काळातील नियोजनाचे महानगरपालिकेद्वारे सादरीकरण करण्यात आले. यावेळी पोलीस, महापालिका आदी विभागांनी केलेल्या नियोजनाची माहिती बैठकीत दिली. यावर उपस्थित सर्व प्रमुख अधिकारी यांनी आपल्या सूचना मांडल्या. प्रयागराज येथे झालेल्या कुंभमेळा धर्तीवर तयार करण्यात आलेल्या पर्वणी काळातील अंदाजित नियोजनाचे महानगरपालिकाद्वारे सादरीकरण करण्यात आले.

# रेल्वे कर्मचाऱ्यांच्या आंदोलनात तीन महिला प्रवाशांचा मृत्यू

मुंबई : मुंब्रा रेल्वे अपघात प्रकरणी रेल्वे कर्मचाऱ्यांनी आंदोलन केल्याने या आंदोलनाचा फटका प्रवाशांना बसला आहे. मुंबईची लाईफलाईन मानली जाणारी लोकल ट्रेनची वाहतूक ऐन गर्दीच्या वेळी खोळंबल्यांने प्रवाशांचा मोठा खोळंबा झाला. रेल्वे कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे मुंबईतील लोकल रेल्वे सेवा विस्कळीत झाली. त्यामुळे लोकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. लोकल बंद असल्याने लोक रेल्वे रुळावरूनच चालत जात होते. याचवेळी पाठीमागून आलेल्या अंबरनाथ फास्ट लोकलने चार प्रवाशांना उडवले. त्यात तीन महिलांचा मृत्यू झाला आहे. मध्य रेल्वेच्या मस्जिद बंदर-सँडहर्स्ट रोड रेल्वे स्थानकादरम्यान ही घटना घडली. प्रवाशांच्या गर्दीच्या वेळी रेल्वे कर्मचाऱ्यांचे जे आंदोलन झाले, त्यामुळेच हा अपघाताची घटना घडल्याचा आरोप प्रवाशांकडून करण्यात आला. मृत महिलांची ओळख पटवण्याचे काम रेल्वे पोलिसांकडून सुरू असून मृतदेह शवविच्छेदनासाठी जे. जे. रुग्णालयात पाठवले आहेत. मुंब्रा येथे झालेल्या अपघातानंतर लोहमार्ग पोलिसांनी दोन अभियंत्यावर कारवाई केल्याच्या निषेधार्थ गुरुवारी रेल्वे कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आंदोलन केले. यामध्ये एनआरएमयूकडून गुरुवारी संध्याकाळी मोर्चा काढण्यात आला. मोटरमनही यात सहभागी झाले होते. कर्मचाऱ्यांनी संध्याकाळी सीएसएमटी स्थानकावर बसून घोषणाबाजी करत आंदोलन केले. हे आंदोलन संध्याकाळी ५.४०च्या सुमारास सुरू झाले होते. ते ६.४० पर्यंत सुरू होते. या आंदोलन काळात मध्य आणि हार्बर रेल्वेची वाहतूक ठप्प झाली होती. पण वरिष्ठांनी मध्यस्थी केल्यानंतर हे आंदोलन स्थगित झाले. यानंतर हळूहळू एक-एक लोकल ट्रेन सुरू झाली. यानंतर मस्जिद बंदर-सँडहर्स्ट रोड रेल्वे स्थानकादरम्यान मोठी दुर्घटना घडली.

# आचारसंहितेसंदर्भातील प्रस्तावांसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती

मुंबई,: स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या कालावधीत आचारसंहितेतून सूट देण्यासाठी प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्याकरिता लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या वेळी स्थापन करण्यात येणाऱ्या समितीच्या धर्तीवर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात यावी, असे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत.

राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली १६ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात मुख्य सचिव आणि शासनातील विविध विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक झाली होती. त्यावेळी अशा स्वरुपाची समिती स्थापन करण्याची गरज व्यक्त करण्यात आली होती. त्यानुसार हे निर्देश देण्यात आले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या आचारसंहितेतून सूट मिळण्यासाठी येणाऱ्या प्रस्तावांची ही समिती छाननी करेल व आचारसंहितेत सूट देण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगास शिफारस करेल. त्यामुळे शासनातील सर्व विभागांनी अशा प्रकारचे प्रस्ताव या समितीमार्फतच राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविणे आवश्यक आहे.

# एम्समधील नॅट केंद्राचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ

नागपूर : अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) नागपूर येथील न्युक्लिक सिड टेस्टिंग (एनएटी) सेंटरचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. अशा प्रकारची सुविधा असणारी एम्स ही मध्य भारतातील पहिलीच सरकारी आरोग्य संस्था आहे. याचवेळी गॅमा ब्लड इरॅडिएटर या उपकरणाचेही उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. एम्सच्या रक्त संक्रमण विभागातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

एनएटी ही रक्त, लाळ किंवा इतर नमुन्यातून रोगजंतू त्वरेने शोधणारी चाचणी आहे. या चाचणीद्वारे एचआयव्ही, हेपेटायटिस बी, हेपेटायटिस सी या सारख्या गंभीर आजारांचे निदान प्राथमिक अवस्थेतच होऊन संबंधित रुग्णावर तातडीने उपचार सुरू होऊ शकतात. अचूक निदान हे या चाचणीचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. हे उपकरण रक्तपेढ्यांमध्ये लावल्यास गरजू रुग्णांना दूषित रक्त देण्याचा धोका जवळपास संपतो. गॅमा ब्लड इरॅडिएटरद्वारे अतिशय शुद्ध रक्त गरजू रुग्णांना मिळू शकते. रक्त संक्रमणातून होणारे आजार या उपकरणामुळे रोखले जातात.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी या दोन्ही उपकरणांची प्रशंसा करतानाच समाजातील गरजूंना त्याचा अधिकाधिक लाभ मिळावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली. प्रारंभी एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी यांनी मुख्यमंत्र्यांचे यावेळी स्वागत केले. अधिष्ठाता डॉ. मृणाल पाठक, महाराष्ट्र मेडिकल



कौन्सिलचे प्रशासक डॉ. विंकी रुघवाणी, एम्स मधील रक्त संक्रमण विभाग प्रमुख डॉ. सौम्या दास, डॉ. पराग फुलझेले, डॉ. रौनक दुबे यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# थोडक्यात...

## जवाहर प्राथमित शाळेत शैक्षणीक साहित्याचे वाटप



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश प्रथम दिनानिमित्त ( the first day of schoo), प्रेमादीप अमर सुतार, याचे पालक श्री. अमर सुतार यांनी इयत्ता तिसरी इ मधील विद्यार्थ्यांना पेन व वही वाटप केले.या प्रसंगी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती साबदे मॅडम, श्री कांबळे सर, सुतार परिवार, वर्गाध्यापक गुरमे सर उपस्थित होते.

## भूमी अभिलेख विभागाची १३ व १४ नोव्हेंबर या कालावधीत विविध परीक्षा केंद्रावर ऑनलाईन परीक्षा

लातूर (प्रतिनिधी) : भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ (भूकरमापक) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता १ ऑक्टोबर, २०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार १ ते २४ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत ऑनलाईन अर्ज स्विकृतीचे कामकाज करण्यात आलेले आहे. या कालावधीत ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा (कॉम्प्युटर बेसड टेस्ट) १३ ते १४ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत महाराष्ट्रातील विविध केंद्रावर घेण्यात येणार आहे. परीक्षेचे विभागनिहाय वेळापत्रक व उमेदवारांच्या परीक्षेचे प्रवेशपत्राबाबत विभागाच्या अधिकृत संकेस्थळावर ://.. या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. पात्र उमेदवाराने संबंधित संकेस्थळावर देण्यात आलेल्या सूचनानुसार प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावयाचे आहे. प्रवेशपत्रावर नमूद परीक्षा केंद्रावर उमेदवरांनी दिलेल्या वेळेत उपस्थित राहून परीक्षा द्यावयाची आहे. परीक्षा केंद्र बदलण्याबाबतच्या कोणत्याही विनंतीचा विचार केला जाणार नाही. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ४ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार ऑनलाईन पध्दतीने (कॉम्प्युटर बेसड टेस्ट) परीक्षेचे आयोजन करण्यात येणार असल्यामुळे उमेदवाराच्या परीक्षा केंद्र हे महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही जिल्हा, तालुका अथवा इतर ठिकाणी असू शकते. तसेच काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या दिनांकामध्ये बदल झाल्यास त्याबाबतची माहिती विभागाच्या https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. परीक्षा पध्दतीबाबतची सविस्तर माहिती पुस्तिका विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरिताची लिंक विभागाच्या उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, असे भूमि अभिलेखचे जमाबंदी आयुक्त आणि संचालक डॉ. सुहासे दिवसे यांनी कळविले आहे.

## एम्स मधील नॅट केंद्राचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ

नागपूर (): अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) नागपूर येथील न्युक्लिक ॲसिड टेस्टिंग (एनएटी) सेंटरचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. अशा प्रकारची सुविधा असणारी एम्स ही मध्य भारतातील पहिलीच सरकारी आरोग्य संस्था आहे. याचवेळी गॅमा ब्लड इरॅडिएटर या उपकरणाचेही उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. एम्सच्या रक्त संक्रमण विभागातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. एनएटी ही रक्त, लाळ किंवा इतर नमुन्यातून रोगजंतू त्वरेने शोधणारी चाचणी आहे. या चाचणी द्वारे एचआयव्ही, हेपेटायटिस बी, हेपेटायटिस सी या सारख्या गंभीर आजारांचे निदान प्राथमिक अवस्थेतच होऊन संबंधित रुग्णावर तातडीने उपचार सुरू होऊ शकतात. अचूक निदान हे या चाचणीचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. हे उपकरण रक्तपेढ्यांमध्ये लावल्यास गरजू रुग्णांना दूषित रक्त देण्याचा धोका जवळपास संपतो. गॅमा ब्लड इरॅडिएटरद्वारे अतिशय शुद्ध रक्त गरजू रुग्णांना मिळू शकते. रक्त संक्रमणातून होणारे आजार या उपकरणामुळे रोखले जातात. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या दोन्ही उपकरणांची प्रशंसा करतानाच समाजातील गरजूंना त्याचा अधिकाधिक लाभ मिळावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली. प्रारंभी एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी यांनी मुख्यमंत्र्यांचे यावेळी स्वागत केले. अधिष्ठाता डॉ. मृणाल पाठक, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे प्रशासक डॉ. विंकी रुघवाणी, एम्स मधील रक्त संक्रमण विभाग प्रमुख डॉ. सौम्या दास, डॉ. पराग फुलझेले, डॉ. रौनक दुबे यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## वंदे मातरम सार्ध शताब्दी महोत्सव दिनी ‘वंदे मातरम’ सामूहिक गायनाचे आयोजन

मुंबई (वृत्तसेवा) : बंकिमचंद्र चटर्जी लिखित ऐतिहासिक वंदेमातरम गीताच्या लिखाणास १५० वर्ष पुर्ण झाल्यानिमित्त सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार व कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून ‘‘वंदे मातरम् सार्ध शताब्दी महोत्सव’’ कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. महाराणा प्रताप औद्योगिक प्रशिक्षण संस्था कुर्ला, मुंबई शहर व उपनगर येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.४५ ते १०.३० या कालावधीत ‘‘वंदे मातरम सार्ध शताब्दी महोत्सव’’ कार्यक्रम आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमासाठी खासदार वर्षा गायकवाड, आमदार पराग शाह जिल्हाधिकारी, तहसीलदार व अन्य अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाची सुरुवात लघु नाटिकेच्या सादरीकरणाने होणार आहे. त्यानंतर डॉ.प्रेरणा प्रमोद क्षीरसागर, राष्ट्र सेविका समिती कोकण प्रान्त बौध्दिक प्रमुख यांचे व्याख्यान होणार आहे. यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ५००० हून जास्त विद्यार्थी एकाच वेळी उपस्थित राहून वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन करणार आहेत.

# वंदे मातरम देशाच्या एकतेचा आवाज-अजित पाटील कव्हेकर

## वंदे मातरमच्या जयघोषाने ट्युशन एरिया दुमदुमला





लातूर (प्रतिनिधी) : वंदे मातरम गीतातून राष्ट्रीयत्वाची भावना आणि मातृभूमीचे प्रेम जागृत होते. हे गीत कोणत्याही धर्म आणि भाषेशी संबंधित नसून याचा धार्मिकतेशी संबंध लावण्याची चूक मागील काळात करण्यात आलेली आहे. त्यामुळे वंदे मातरम हे गीत दाबण्याचा प्रयत्नही त्यावेळी करण्यात आलेला होता. मात्र वंदे मातरम हे आपल्या देशाच्या एकतेचा आवाज असून याचा जयघोष आणि उद्घोष सातत्याने व्हावा असे आवाहन भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

बकिमचंद्र चटोपाध्याय लिखित वंदे मातरम या राष्ट्रगाणला १५० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल लातूर शहर जिल्हा भाजपच्या वतीने व आर.सी.सी., आय.आय.बी., विद्याआराधना यांच्या सहकार्यातून ट्युशन एरिया येथे ७,००० पेक्षा अधिक विधार्थ्यांच्या उपस्थितीत सामुहिक वंदे मातरम गायन करण्यात आले. यावेळी अजित पाटील कव्हेकर बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, निवडणूक प्रमुख डॉ.अर्चना पाटील चाकूरकर, प्रा.शिवराज मोटेगावकर, प्रा.सतीश पवार, प्रा.निळकंठ मीरकले, संजय लड्डा, माजी शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, सरचिटणीस प्रवीण कस्तुरे, निखील गायकवाड, रागिणी यादव, संजय गिर, व्यंकटेश कुलकर्णी, महिला मोर्चा अध्यक्षा शीतल मालू, मंडल अध्यक्ष निर्मला कांबळे, सुरेश जाधव, राहुल भुतडा, काकासाहेब चौगुले, विशाल हावा पाटील, रोहित पाटील, सचिन सुरवसे, गोपाळ वांगे, राजकुमार गोजमगुंडे अनुसूचित मोर्चा अध्यक्ष पवन आल्टे, ओ.बी.सी. मोर्चा अध्यक्ष प्रमोद गुडे, सुरेश राठोड, श्रीकांत रांजणकर, प्रा.उदय देशपांडे, दिपक मठपती आदींची उपस्थिती होती.

१८७५ मध्ये बकिमचंद्र चटोपाध्याय यांनी आपल्या आनंद मठ या कादंबरीतून वंदे मातरम हे गीत निर्माण केले असल्याचे सांगून अजित पाटील कव्हेकर म्हणाले कि, वंदे मातरम या गीताने स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणा अधिक जागृत करून क्रांतीकरांना व स्वातंत्र्यसेनानी यांना प्रेरित केले होते. त्यावेळी प्रत्येकाच्या हृदयात वंदे मातरम हे स्वातंत्र्य लढ्याच्या शक्तीचे स्त्रोत बनले होते. आजही प्रत्येक भारतीयांच्या अंतकरणात वंदे मातरम वसलेले असून हे राष्ट्र अभिमानाचे प्रतिक आहे. मात्र याच वंदे मातरम गीताचा संबंध धार्मिकतेशी जोडण्याची चूक त्यावेळी काँग्रेसने केली असल्याचे अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले. या कारणाने वंदे मातरमला दाबण्याचा प्रयत्नही सातत्याने त्यावेळी झालेला होता. मात्र वंदे मातरम हे राष्ट्रभक्तीचे आणि मातृभुमीप्रती प्रेम व्यक्त करण्याचे ऊर्जास्त्रोत असून याचा धार्मिकतेशी कोणताही संबंध नसल्याचे सांगितले आहे. आजही वंदे मातरम प्रत्येक भारतीयांच्या मनामनात आणि कणाकणात वसलेले असून वंदे मातरम हे गीत राष्ट्रीय एकतेचा आवाज असल्याचे सांगून याचा जयघोष आणि उद्घोष सातत्याने व्हावा असे आवाहन शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले. यावेळी आसावरी जोशी यांच्यासमवेत ७,००० पेक्षा अधिक विद्यार्थी व उपस्थित भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते व नागरिकांनी सामुहीकरित्या वंदे मातरमचे गायन केले. यानंतर वंदे मातरमच्या जयघोषाने संपूर्ण ट्युशन एरिया दुमदुमला गेला. यावेळी प्रा.शिवराज मोटेगावकर, प्रा.सतीश पवार, प्रा.निळकंठ मीरकले, संजय लड्डा व आसावरी जोशी यांचे विशेष सहकार्य लाभल्या बद्दल शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी आभार व्यक्त केले. यावेळी माजी स्थायी समिती सभापती ॲड. दिपक मठपती, शोभा पाटील, श्वेता लोंढे, स्वाती घोरपडे, वर्षा कुलकर्णी, मीना भोसले, प्रवीण घोरपडे, शिरीष कुलकर्णी, शीतल पाटील, किशन बडगिरे, मोहसीन शेख, अमजद पठाण, अनिल पतंगे, विनय जाकते, श्रीराम कुलकर्णी, भरत भोसले, धनंजय हाके, गणेश गवारे, राजन सोनवणे, मधुसूदन पारीख, शामसुंदर मानधना, गणेश हेड्डा, संजय सूर्यवंशी, सीमा करपे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षक पात्रता परीक्षेबाबत अधिकृत संकेतस्थळावरील सूचनांचे अवलोकन करावे

### महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक

मुंबई (वृत्तसेवा) : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयामार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२५ परीक्षचे आयोजन रविवार, २३ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले आहे. याबाबत सर्व संबंधितांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या .. व ://. या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व माहितीचे अवलोकन करावे. परीक्षेसंबंधी कोणत्याही चुकीच्या व दिशाभूल करणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२५ च्या आयोजनाची कार्यवाही सुरू असून, परीक्षेसंबंधित कार्यवाहीबाबत वेळोवेळी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर अधिकृत माहिती देण्यात येते. तथापि, परीक्षेसंबंधी यूट्यूब चॅनेल्स, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे व प्रसार माध्यमाद्वारे दिल्या जाणाऱ्या चुकीच्या व दिशाभूल करणाऱ्या बातम्या/ अफवांवर विश्वास न ठेवता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व माहितीचे अवलोकन करावे. परीक्षेसंबंधी कोणत्याही चुकीच्या व दिशाभूल करणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवून झालेल्या नुकसानीस उमेदवार/ विद्यार्थी सर्वस्वी जबाबदार असतील, याची गांभीर्याने नोंद घ्यावी, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

## महाराष्ट्र शासनाचे १२ वर्षे मुदतीचे १,००० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

मुंबई (वृत्तसेवा) : महाराष्ट्र शासनाच्या १२ वर्षे मुदतीच्या १,००० कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या दहा टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. ११ नोव्हेंबर , २०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् ११ नोव्हेंबर , २०२५ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत. यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान १२ नोव्हेंबर, २०२५ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.





यशवंतराव चव्हाण सेंटर सभागृहात मंगळवार दिनांक ४ नोव्हेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता मा. उपसभापती डॉ.श्रीमती. निलम गोऱ्हे मॅडम यांच्या लिखीत ‘‘ दाही दिशा ‘‘ पुस्तिकेचे प्रकाशन राज्याचे उपमुख्यमंत्री ना.श्री. एकनाथ शिंदे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले . यावेळी माननीय उपसभापती डॉ.निलमताई गोऱ्हे यांनी पुस्तक भेट देताना सोबत शिवसेनेच्या उपनेत्या मा.कला शिंदे मॅडम आणि पुस्तक स्विकारतांना पुरस्कार प्राप्त सुरेकांत इंगळे

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त अनुयायांसाठी उत्तम दर्जाच्या सुविधा पुरवाव्यात- केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

मुंबई (वृत्तसेवा) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे देशभरातून लाखो अनुयायी अभिवादन करण्यासाठी येतात. या अनुयायांना कोणतीही गैरसोय होऊ नये आणि त्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरवाव्यात, असे निर्देश केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वतयारीबाबत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस माजी राज्यमंत्री अविनाश महातेकर, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, पोलीस महानिरीक्षक मनोज शर्मा, मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त प्रशांत सपकाळे, बार्टीचे महासंचालक सुनिल वारे, सामाजिक न्याय विभागाचे सहसचिव सो. ना. बागुल, तसेच भन्ते डॉ.राहुल बोधी, महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यमंत्री आठवले म्हणाले, चैत्यभूमी येथे अनुयायांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी मुंबई महापालिका, गृह विभाग व सामाजिक न्याय विभाग तसेच सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. प्रत्येक विभागाने आपल्याला दिलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडावी. गर्दी टाळण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने खबरदारी घ्यावी. गर्दी नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षा व्यवस्था, पिण्याचे पाणी, शौचालय, आरोग्य सुविधा, प्रकाश व्यवस्था आणि परिसर स्वच्छता या सर्व बाबींकडे विशेष लक्ष द्यावे. तसेच पोलीस प्रशासनाने अनुचित प्रकार टाळण्यासाठी सतर्क राहावे, असे राज्यमंत्री आठवले यांनी सांगितले. या बैठकीत चैत्यभूमी परिसर आणि शिवाजी पार्क परिसरातील रस्त्यांची सुधारणा, वाहतुकीचे नियंत्रण, सीसीटीव्ही व्यवस्था, भोजन व आरोग्य सुविधा, शासकीय जाहिरात प्रसिध्दी आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी यासंबंधीची सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

# भाजपची रणनीती : आ.संभाजी पाटील निलंगेकर जिल्हा निवडणूक प्रभारी

## आ.अभिमन्यू पवारांकडे ग्रामीण तर डॉ.अर्चना चाकूरकर शहर प्रमुख







लातूर (प्रतिनिधी) : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भारतीय जनता पक्षाने तयारीचा बिगुल वाजवला आहे. पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी आणि निवडणुकीतील रणनीती आखण्यासाठी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी प्रत्येक जिल्ह्यासाठी प्रभारी आणि निवडणूक प्रमुखांची नियुक्ती जाहीर केली आहे. या पार्श्वभूमीवर लातूर जिल्ह्याची महत्त्वाची जबाबदारी माजी मंत्री आणि आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या हाती सोपविण्यात आली आहे. त्यांची लातूर जिल्हा निवडणूक प्रभारी म्हणून अधिकृत नियुक्ती करण्यात आली असून, या निर्णयामुळे लातूरमधील भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. प्रदेशाध्यक्षांनी जाहीर केलेल्या यादीत लातूर ग्रामीण भागातील निवडणुकीची जबाबदारी आमदार अभिमन्यू पवार यांच्या हाती देण्यात आली आहे. तर लातूर शहरातील निवडणुकीसाठी पक्षाने डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांच्यावर विश्वास दाखवला आहे. शहर, ग्रामीण आणि जिल्हास्तरावर अशा पद्धतीने जबाबदाऱ्या विभागून पक्षाने निवडणूक व्यवस्थापनाची चोख तयारी केली आहे. रवींद्र चव्हाण यांनी स्पष्ट केले आहे की राज्यभरातील जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी पक्ष सज्ज झाला आहे. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात प्रभारी आणि प्रमुख नियुक्त करून स्थानिक पातळीवर पक्षकार्याला गती देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. लातूर जिल्ह्याच्या प्रभारीपदी पुन्हा एकदा संभाजी पाटील निलंगेकर यांची नियुक्ती होणे ही पक्षाच्या त्यांच्या नेतृत्वावर असलेल्या विश्वासाची पावती आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्यावर लातूर ग्रामीण भागाची जबाबदारी देण्यात आली आहे. ग्रामीण मतदारसंघांमध्ये पक्षसंघटन वाढवणे, कार्यकर्त्यांशी समन्वय राखणे आणि आगामी निवडणुकीत पक्षाच्या धोरणांची मांडणी करणे हे त्यांच्या जबाबदारीत येणार आहे.

लातूर शहर विधानसभा मतदारसंघात मागील निवडणुकीत निसटता पराभव पत्करलेल्या डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांच्यावरही आता पक्षाने विश्वास ठेवत शहराच्या निवडणुकीची जबाबदारी दिली आहे. त्यांच्या सक्रिय आणि संघटनात्मक कार्यामुळे शहरातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवीन उत्साह दिसून येत आहे. गेल्या निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपने लातूर जिल्ह्यात उल्लेखनीय कामगिरी केली होती. विशेषतः जिल्हा परिषद आणि महापालिकेत पक्ष ‘झिरो टू हिरो’ ठरला होता. अनेक नगरपालिकांमध्येही भाजपचा झेंडा फडकला आणि संघटनाची ताकद सर्वांसमोर आली. याच यशाच्या पार्श्वभूमीवर पक्षाने पुन्हा एकदा निलंगेकर यांच्यावर विश्वास टाकत जिल्हा प्रभारीपदाची जबाबदारी दिली आहे. दरम्यान आता संभाजी पाटील निलंगेकर, अभिमन्यू पवार आणि डॉ. अर्चना चाकूरकर या तिन्ही नेत्यांना एकत्रितपणे काम करत पक्षाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजय मिळवून द्यावा लागणार आहे.

मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग मॅजिक पब्लीकेशन, शॉप नंबर १०-मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर ४१३५१२ जि. लातूर येथे छापून मालक, प्रकाशक, संपादक शिरीषकुमार तुकाराम शेरखाने यांनी घर नंबर २१५, ऋतूप्रेम, मुक्ताई नगर, एस. टी. वर्कशॉप पाठीमागे, अंबाजोगाई रोड, लातूर हे पत्रक जि.लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले. संपादक: शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो.९०४९८४४४१२ (टिप: सर्व वाद लातूर न्यायकक्षेत) Email: shirishkumarsherkhane@gmail.com *RNI No.: MAHMAR/2023/86200

PRINTED BY GHONE NARSHINHA PANDURANG PRINTED AT MAJIC PUBLICATION, shop number 10 MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, TQ & DIST. LATUR-413512
OWNED BY, PUBLISHED BY & EDITED BY SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE, PUBLISHED AT * EDITOR: SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE Mob.No.: 9049844412 House No. 215, RUTUPREM, MUKTAI NAGAR, AMBAJOGAI ROAD, BEHIND S.T.WORK SHOP LATUR DIST. LATUR-413512 (MAH.)Email: shirishkumarsherkhane@gmail.com* RNI No.: MAHMAR/2023/86200